# महाराष्ट्र कारागृह वार्तापत्र

माहे मार्च-२०१८, अंक - ४६ वा, पुणे







*कारागृह विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना होळी, गुढीपाडवा व जागतिक महिला दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा*

## संपादकीय संदेश

या महिन्यात जागतिक महिला दिन, होळी व गुढीपाडवा हे उत्सव आपण आपल्या कुटूंबियांसह मोठ्या उत्साहात साजरे करणार आहोत, त्यानिमित्त सर्व कारागृह अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटूंबीय यांना मनापासून हार्दीक शुभेच्छा.

हे सण साजरा करीत असतांना, कारागृह विभागातील कोणत्या क्षेत्रात आपण आपल्या कार्यक्षमतेत सुधारणा केली आहे ? तसेच, आपण आपल्या ज्ञानात भर घातली आहे काय ? आपण चांगली पुस्तके वाचत आहोत काय ? आपल्या कारागृहाच्या "प्रिझम प्रणाली" बाबत आपण माहिती जाणून घेतली आहे काय ? आपण आपल्या कुटूंबाच्या कल्याणासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग केला आहे काय ? याबाबत आत्मपरिक्षण होणे गरजेचे आहे.

आत्मपरिक्षण करणेसाठी आपले शरीर व मन निरोगी व सुदृढ राखण्यासाठी प्रत्येकाने दररोज नियमितपणे योगासन व व्यायाम करणे गरजेचे आहे. आपले मन व शरीर सुदृढ राहिल्यास आपण सतर्क राहून आपले कारागृह सुरक्षित ठेवू शकतो.

तर मग चला, दररोज नियमितपणे व्यायाम व योगासन करू या. तसेच, प्रिझम प्रणालीच्या माध्यमातून आपल्या खात्याचे संपूर्ण संगणकीकरणाद्वारे आधुनिकीकरण यासाठी देखील कार्य करू या.

कारागृह विभागामध्ये सुरक्षा, संगणकीकरण आणि शारिरीक सक्षमता/ सतर्कता आणणेसाठी सर्व कारागृह अधिकारी व कर्मचारी हे मनापासून प्रयत्न करतील, अशी अपेक्षा आहे.

आपण संघभावनेने जबाबदारीपूर्वक काम करू या. हे वार्तापत्र आपल्या सर्व कर्मचारी व बंद्यांपर्यंत पोचवा, त्यामुळे इतर कारागृहात काय चालले आहे, हे सर्वांना कळेल आणि त्यातून सर्वजण संघ भावनेने काम करतील.

***- डॉ भूषण कुमार उपाध्याय, भा.पो.से.***

## बंदी कला रजनी 'तिमीरातून तेजाकडे' डिसेंबर-२०१७





'सुधारणा व पुनर्वसन' हे कारागृहाचे ब्रीदवाक्य असून कारागृह हे एक सुधारगृह आहे. त्या अनुषंगाने कारागृहातील बंद्यांसाठी विविध कल्याणकारी उपक्रम राबविण्यात येतात. कारागृहातील बंदी हे देशाच्या विविध भागातून आलेले असतात. साहजिकच त्यांच्यात विविध प्रकारचे उपजत कलागुण असतात. त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी व त्यांच्यातील कौशल्य समाजासमोर यावे, या उद्देशाने 'बंदी कलारजनी' या कार्यक्रमाची संकल्पना तयार झाली. याचाच एक भाग म्हणून नागपूर हिवाळी अधिवेशनाचे दरम्यान 'तिमिरातून तेजाकडे' हा कार्यक्रम दि. १५.१२.२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, सर्व मंत्री परिषद, मंत्रालयीन वरिष्ठ अधिकारी यांचे उपस्थितीत नागपूर येथे देशपांडे सभागृहात संपन्न झाला. 'तिमिरातून तेजाकडे' या कार्यक्रमात दोन मित्रांचा जीवनप्रवास व जीवनप्रवासात त्यांची चुकलेली वाट आणि प्रायश्चित्तानंतर त्यांच्या जीवनाचा कसा कायापालट झाला याचे सुंदर चित्रण विविध नृत्य व संगीताच्या माध्यमातून सादर करण्यात आले. सदरचा कार्यक्रम उपस्थित मान्यवरांची व प्रेक्षकांची भरपूर दाद मिळवून गेला.





या कार्यक्रमात महाराष्ट्रातील नागपूर मध्यवर्ती कारागृह, येरवडा मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, मोर्शी खुले कारागृह व गडचिरोली खुले कारागृह अशा एकुण सहा कारागृहातील ७५ पुरुष व ११ महिला बंद्यांनी सहभाग घेतला होता.

---

## येरवडा मध्यवर्ती कारागृह





दि.१७/१/२०१८ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह व भोई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. शंकर महादेवन सुप्रसिद्ध गायक व संगीत संयोजक यांच्या संगीतमय गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. श्री. शंकर महादेवन व श्री. इकबाल दरबार या मान्यवरांचा सत्कार डॉ भूषण कुमार उपाध्याय, अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ.विठ्ठलराव जाधव, विशेष पोलीस महनिरिक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे, श्रीमती स्वाती साठे कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग, येरवडा,पुणे, श्री. यु.टी.पवार, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह तसेच श्री. डॉ.मिलिंद भोई, अध्यक्ष, भोई प्रतिष्ठाण, पुणे हे मंचावर उपस्थित होते. या वेळी इकबाल दरबार यांनी **'ये जिंदगी उसिकी है'** हे गाणे सेक्सोफोनवर सादर केले. यावेळी बंदीकलाकार नितीन आरोळे याने **'और इस दिल मे क्या रखॉ है'** हे गीत सादर केले. इकबाल दरबार या पुण्याच्या प्रसिद्ध बॅडने श्री.शंकर महादेवन यांच्या बहारदार गायनाला साथसंगत केली. **'सूर निरागस हो...,गणनायकाय गणदैवताय...,मन उधाण वाऱ्याचे...,ब्रेथलेस-कोई जो मुझे मिला तो ऐसा लगता है....'** ही गीते सादर केल्यावर **'सुनो गौर से दुनियावालो'** हे देशभक्तीपर गीत सादर केले. सर्व बंदीजन व उपस्थितांनी टाळयांच्या गजरात त्यांच्या या सदाबहार गीतांना दाद दिली. यानंतर सर्व रसिक प्रेक्षकांच्या मागणीवरुन त्यांनी तारे जमीं पर या चित्रपटातील **'तुझे सबकुछ पता है ना माँ...'** हे गीत सादर करुन सुंदर अशा बहारदार संगीतमय कार्यक्रमाची सांगता केली. प्रस्तुत संगीतमय कार्यक्रम हा कारागृहातील बंदीजनांसाठी मनोरंजनाची पर्वणी देणारा व एक अविस्मरणीय अनुभव देणारा कार्यक्रम ठरला.






# अधिकारी/कर्मचारी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०१८





कारागृहातील दैनंदिन कामकाजातील ताणतणाव व थकवा दूर व्हावा या उद्देशाने कारागृह विभागात क्रीडा स्पर्धांचे दरवर्षी आयोजन केले जाते. दि. ५.०३.२०१८ ते ११.०३.२०१८ या कालावधीत महाराष्ट्र कारागृह विभागातील राज्यस्तरीय क्रीडा स्पार्धेचे दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे मैदानावर आयोजन करण्यात आले होते. दि. ५.०३२०१८ रोजी स्पर्धेचा उद्घाटन सोहळा डॉ. भूषणकुमार उपाध्याय, अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या शुभ हस्ते व श्री. विठ्ठल जाधव, विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय), श्री. राजवर्धन, विशेष पोलीस महानिरीक्षक, दधिण विभाग, श्रीमती स्वाती साठे, कारागृह





उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, श्री. राजेंद्र धामणे, कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद, श्री. योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर तसेच श्री. एस. व्ही. खटावकर, प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालया, पुणे, श्री. यु.टी.पवार, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह यांचे प्रमुख उपस्थितीत दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रांगणात पार पडला. यामध्ये कारागृह विभागातील मुख्यालय, पश्चिम विभाग, दक्षिण विभाग, मध्य विभाग व पूर्व विभाग अशा पाच विभागातील एकुण २६७ महिला व पुरुष स्पर्धकांनी उत्स्फुर्तपणे भाग घेतला होता. क्रीडा स्पर्धेच्या दरम्यान दि. १०.०३.२०१७ रोजी खेळाडूंच्या मनोरंजासाठी पुणे येथील सुपसिध्द गायक श्री जितेंद्र भुरुक प्रस्तुत ‘यादों के पल’ या संगीत-रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ११.०३.२०१८ रोजी जेष्ठ क्रीडा समीक्षक श्री सुनंदन लेले व महाराष्ट्र केसरी कुस्तीपटू श्री अभिजीत कटके यांचे प्रमुख उपस्थितीत व त्यांचे शुभ हस्ते बक्षिस वितरण सोहळा पार पाडण्यात आला. यामध्ये कारागृह विभागातून मध्य विभागास सर्वोत्कृष्ट विजेता संघाचा व पश्चिम विभागास उपविजेता संधाचा बहुमान मिळाला, तु.अ. श्रेणी-२-ये.म.का. श्री रणजितसिंह पाटील व श्रीमती स्वाती शेळके-महिला रक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, यांना अनुक्रमे उत्कृष्ट पुरुष व उत्कृष्ट महिला खेळाडूचा मान मिळाला. याप्रसंगी जेष्ठ क्रीडा समीक्षक श्री सुनंदन लेले यांनी खेळाडूंचे कौतुक केले व आपले मार्गदर्शनपर भाषणात खेळाडूंना खेळाचे महत्त्व पटवून देवून आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्याकरीता खेळ एक महत्त्वाचे माध्यम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सदर क्रीडा स्पर्धा पार पाडण्याकरीता श्रीमती स्वाती साठे यांचे मार्गदर्शनाखाली प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय व अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह तसेच तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयातील अधिकारी/ कर्मचारी व निदेशक यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## मुंबई मध्यवर्ती कारागृह





मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे श्री. राजवर्धन सिन्हा, विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, मुंबई यांच्या प्रेरणेने व श्री. हर्षद अहीरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या मार्गदर्शनाखाली खेरवाडी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने बंद्यांसाठी “संगीत से मानसिक तणावमुक्ती“ या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रसिध्द संतुरवादक श्री. विवेक जोशी यांनी संगीताच्या माध्यामातुन देखील तणावमुक्ती मिळू शकते, याचा अनुभव बंद्यांना तसेच कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना दिला.

# महिला दिन विशेष कार्यक्रम






## येरवडा महिला कारागृह

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. २३.०३.२०१८ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृहातील महिला विभागामध्ये महिला बंदींच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन अपर पोलीस महासंचालक डॉ भूषण कुमार उपाध्याय , यांचे हस्ते करण्यात आले. महिला बंद्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील कला कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये १७ शिक्षाधिन बंदी व १५ न्यायाधिन बंदीं अशा एकुण ३२ महिला बंदीनी व ५ लहान मुलांनी या मनोरंजनात्मक अशा सांस्कृतिक कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला. यामध्ये लावणी नृत्य, गौरव महाराष्ट्राचा, घुमर नृत्य, पंजाबी फ्युजन, डोला-रे-डोला, भरतनाट्यम् आणि लहान मुलांनी झुबी-डुबी या गाण्यावर नृत्य केले. तसेच विनोदी नाटक व भारूड सादर केले. महिला बंदींच्या सुंदर अशा फॅशन शो ने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ विठ्ठल जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ‘आम्ही कल्पना केली त्यापेक्षाही कितीतरी पटीने हा कार्यक्रम सुंदर झाला’. यावेळी कारागृह उपमहानिरीक्षक यांनी सदरच्या कार्यक्रमाची प्रशंसा करुन महिला बंदींचे तसेच कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणा-या सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले.

---





## कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह

दि. ८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त कोल्हरपूर मध्यवर्ती कारागृह येथे महिला विभागात महिला बंद्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला बंद्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्या महिला बंदींना मान्यवरांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. कार्याक्रमाची सुरुवात विविध उल्लेखनिय कामगिरी केलेल्या महिलांच्या प्रतिमांचे पूजनाने करण्यात आली. यानंतर महिला बंद्यांनी विविध गिते, नृत्य, लावण्या, लोकगिते व एकांकिका सादर केल्या. यावेळी महिला कर्मचा-यानी सुध्दा आपल्या सुप्त कलागुणांना वाव देत विविध नृत्य सादर केली. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सिनेकलाकार श्रीमती छायाताई पवार-निढोरीकर, श्रीमती लता भोसले, महापौर सौ. स्वाती यवलुजे,भगिरथी महिला संस्था कोल्हापूरच्या अध्यक्षा सौ. अरुधंती महाडीक, स्मिता फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती सावंत तसेच श्रीमती प्रकृती निगम, असिस्टंट कमिशनर, सेंट्रल एक्साईज उपस्थित होत्या.प्रस्तुत कार्यक्रमाचे दरम्यान,भगिरथी महिला संस्था कोल्हापूरच्या अध्यक्षा सौ. अरुधंती महाडीकयांनी महिला दिनानिमित्त बंद्यांकरीता २०० पुस्तके ग्रंथालयास भेट दिली.

---

## अमरावती मध्यवर्ती कारागृह





अमरावती मध्यवर्ती कारागृह व व-हाड संस्था, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने दि. ८.०३.२०१८ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी महिला बंद्यांसाठी विविध स्पर्धा उदा. निबंधस्पर्धा, रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महिलांसाठी प्रबोधनपर सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आला. तसेच महिला कर्मचा-यांचा यावेळी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन कारागृह अधीक्षक श्री रमेश कांबळे, उप-अधीक्षक श्री पेट्रस गायकवाड, वरिष्ठ तुरुंगअधिकारी अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी व-हाड संस्थेच्या विणा व-हाडे, प्रमिला मेश्राम व इतर सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहूण्या म्हणून प्रा. डॉ. ठाकरे उपस्थित होत्या.

***मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मान्यतेने प्रकाशित***

***निर्मिती :- श्रीमती रजनी कलश मोटके, शिक्षिका***

***अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१***